लोकमत सोलापूर, सोमवार, दि. २७ जुलै २०१५



वसुंधरा चित्रपट महोत्सवानिमित्त पथनाट्ये सादर करताना महाविद्यालयीन कलाकार मंडळी.

## वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव : पाच महाविद्यालयांचा सहभाग

# पथनाट्यातून ज्वलंत विषयांवर प्रबोधन

सोलापूर: गेल्या चार दिवसांपासून किर्लोस्कर उद्योग समूह आणि सृजन फिल्म सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रमहोत्सवाच्या आज समारोपाच्या दिवशी दुपारच्या सत्रात चार हुतात्मा पुतळ्याजवळ पथनाट्यातून कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी पटवून दिले.

या पथनाट्य स्पर्धेसाठी शहरातील पाच महाविद्यालयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'शून्य कचरा स्वत:पासून' हा या स्पर्धेचा विषय होता. शहरातल्या एस .व्ही .सी.एस. तंत्रनिकेतन, दयानंद महाविद्यालय, संगमेश्वर महाविद्यालय, चंडक तंत्रनिकेतन, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेत दयानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यात स्वच्छता अभियान, पर्यावरण, स्वत:पासून स्वच्छतेस सुरुवात करावी, असे विषय त्यांनी मांडले.

त्यांनी केलेले सादरीकरण उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. सिंहगड कॉलेजने विनोदाच्या माध्यमातून हागणदारीमुक्तचा संदेश दिला. पथनाट्य पाहण्यासाठी विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

यावेळी परीक्षक म्हणून डॉ. व्ही.सी. दंडे, आर .ए . ननवरे यांनी काम पहिले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ऋषीकेश कुलकर्णी, रमेश वाघज,आलुरे, सुनील जमादार, गणपा यादवाड, सागर भुजबळ, कल्याणी वैद्य, पूजा वैद्य, नागनाथ छत्रबंद, नागेश तुळे आदींनी परिश्रम घेतले. (प्रतिनिधी)